महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दूरध्वनीक्र. २६३८३००४/२६३८३०१६
Email ID: ddadm.des@hotmail.com
dydiradm.des@maharashtra.gov.in

**डाक नोंदणीने पोच देय**

क्रमांक: नाभप्र/अवसांसं/प्रया/अन्वे, गट-क/२०२४/१९२/प्रशा-२/ ७ दिनांक: 03/09/2025

**कार्यालयीन आदेश**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कार्यकक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १३/०७/२०२३ रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन दिनांक १९ ऑक्टोबर, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत प्रतिक्षा यादीतून पात्र ठरलेल्या खालील उमेदवारांची अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या **अन्वेषक, गट – क** संवर्गात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातून सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर : एस – ८ : २५५०० – ८११०० या वेतनश्रेणीत ते रुजू होतील त्या दिनांकापासून अनुज्ञेय मूळ वेतनावर पुढील आदेश होईपर्यंत खाली नमूद केलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत असून त्यांची पदस्थापना खालील तक्त्यात स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात करण्यात येत आहे. त्यांना शासन नियमांनुसार मूळ वेतनाव्यतिरीक्त इतर भत्तेही अनुज्ञेय राहतील.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | नियुक्तीचा प्रवर्ग | ज्या कार्यालयात पदस्थापना करण्यात आली ते कार्यालय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. सागर सुखदेव साबळे<br>फ्लॅट नंबर – ७०२, 'एफ' विंग, रागा आल्टीस, गोल्डन सिटी, इटखेडा, छत्रपती संभाजीनगर – ४३१००१ | खुला | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, पालघर**<br>जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय, जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड कोळगांव,ब्लॉक क्र. ००२ तळमजला नवीन इमारत, पालघर- ४०१४०४ |
| २ | श्री. विश्वजीत शिवाजीराव जाधव<br>फ्लॅट नंबर – ३०३, शिवसाई अपार्टमेंट, कल्पना नगर, लातूर – ४१३५३१ | खुला | **अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई**<br>प्रशासकीय ईमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१ |
| ३ | श्री. कुणाल कांतीलाल दाते<br>कमलेश, मित्रविहार कॉलनी, रुक्मिनी लॉन्स समोर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक – ४२२००३ | इमाव | **अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, नाशिक**<br>जुनी अश्विनी बॅरेक क्र.२३, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, नाशिक- ४२२१०१ |
| ४ | श्री. अविनाश संजय कहांडळे<br>मु. पो. टाकळी (विंचूर), ता. – निफाड, नाशिक – ४२२३०६ | आदुघ | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नाशिक**<br>सातपुर एम.आय.डी.सी.विश्राम गृह, त्र्यंबक रोड,सातपूर, नाशिक - ४२२००७. |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | नियुक्तीचा प्रवर्ग | ज्या कार्यालयात पदस्थापना करण्यात आली ते कार्यालय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ५ | श्री. ऋषिकेश बाबासाहेब राजगे<br>मु. पो. सावंत कॉलनी, शिरोली पुलाची,<br>ता. – हातकणंगले,<br>कोल्हापूर – ४१६१२२ | भज – क | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, रायगड**<br>नियोजन भवन,०१ ला मजला,<br>जिल्हाधिकारी कार्यालय<br>रायगड-अलिबाग- ४०२२०१ |
| ६ | श्रीमती सुलताना असादखान पठाण<br>D – १४, वन अर्थ अपार्टमेंट, हॉटेल<br>निकी बंट्स शेजारी, मोळाचा ओढा,<br>सैदापूर, सातारा – ४१५००१ | आदुघ<br>(महिला) | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, रायगड**<br>नियोजन भवन,०१ ला मजला,<br>जिल्हाधिकारी कार्यालय<br>रायगड-अलिबाग- ४०२२०१ |
| ७ | श्रीमती रुबिना शागिरभाई आतार<br>फ्लॅट नंबर – ८०६, 'ब' विंग, कोंढवा,<br>सासवड रोड, येवलेवाडी,<br>पुणे – ४११०४८ | इमाव<br>(महिला) | **जिल्हा सांख्यिकी कार्यालय, मुंबई शहर**<br>७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन,<br>मंत्रालय समोर, चर्चगेट, मुंबई – ४०००३२ |

**(अ) उमेदवारांनी नियुक्तीपूर्वी अग्रक्रमाने पुर्तता करावयाच्या शर्ती**

**उमेदवाराने रूजू होताना खालील मुळ प्रमाणपत्र व त्याची एक छायांकित प्रत सोबत आणावी**

(१) अन्वेषक, गट – क पदासाठी आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्याबाबतची तसेच किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा उच्च शैक्षणिक पात्रता जसे पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने मान्य केलेल्या तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रक

(२) वयाचा पुरावा (जन्मतारखेचा मूळ दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणप्रत्र)

(३) मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र. ३३२/१२/१६-ब, दिनांक १८ मे, २०१३ मध्ये नमुद सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. **मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.** उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेतलेले जाती वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्तीसाठी हजर होताना ते सादर करावे, नसल्यास उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे नियुक्ती प्राधिकाऱ्यास तात्काळ सादर करावी. **जात वैधता पडताळणी समितीकडून अन्वेषक, गट – क पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकल्यास सदर उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल.** तथापि, ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आलेली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/ मावक-५, दि. १६.५.२००७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब) (क) व (ड), विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले व विहीत नमुन्यातील व विहीत कालावधीतील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे.

(५) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र.

(६) **संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबत**

१. माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्रमांक – मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४/०२/२०१३ व त्यामध्ये शासन पुरकपत्र क्रमांक – मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये केलेल्या सुधारणांनुसार संगणक माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट – अ मध्ये नमूद केलेले व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणारे संगणक विषयी अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र उमेदवारांना रुजू होताना सादर करावे लागेल.

किंवा

२. महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, २०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(७) समांतर आरक्षणाअंतर्गत (माजी सैनिक / अंशकालीन / खेळाडू / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / अनाथ / दिव्यांग) सक्षम प्राधिका-याने दिलेले मुळ प्रमाणपत्र.

(८) **माजी सैनिक या समांतर आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी सादर करावयाच्या स्वयंघोषणापत्राबाबत**

१. माजी सैनिक या समांतर आरक्षणाअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण-२०१४/(प्र.क्र.३६४/१४)/२८, दिनांक ०३/०६/२०१६ मधील तरतुदींनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयात प्रथम नियुक्ती स्विकारताना उमेदवाराने ज्या विविध पदांसाठी अर्ज केलेले आहेत, त्याबाबतची दिनांकानिहाय सविस्तर माहिती स्वतःच्या स्वाक्षरीने लेखा स्वयंघोषणापत्राच्या स्वरुपात संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

२. अर्थ व सांख्यिकी संचालनालयात नियुक्तीपूर्वी जर उमेदवार राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालयात माजी सैनिक आरक्षणाचा लाभ घेऊन कार्यरत असल्यास सदर पदावर रुजू होतांना दिलेल्या स्वयंघोषणापत्राची प्रत अर्थ व सांख्यिकी संचालनालयात रुजू होताना सादर करावी. सदर स्वयंघोषणापत्रात अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अन्वेषक पदाचा समावेश असल्यास उमेदवार नियुक्तीस पात्र राहील अन्यथा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक – आरटीए-१०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८, दिनांक ३०/१२/१९९१ मधील तरतुदी लागु राहतील.

**(ब) नियुक्तीच्या अटी**

१. **<u>हमीपत्र:</u>** विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ मधील नियम क्रमांक ३.९ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हमीपत्र रूजू होताना लिहून द्यावे लागेल (परिशिष्ट-१).

२. **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन:** वरील उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुना-अ मधील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल (परिशिष्ट-२).

३. **निष्ठा शपथपत्र:** नियुक्ती स्विकारल्यानंतर उमेदवारांना नोकरनाम्यावर तसेच निष्ठा शपथेवर स्वाक्षरी करावी लागेल (परिशिष्ट-३).

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेली माहिती, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर केलेली प्रमाणपत्रे अयोग्य असल्याचे आढळून आल्यास तसेच सदर भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा भविष्यात अन्वेषक, गट – क पदासाठीची अहर्ता धारण करित नसल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल.

५. प्रस्तुत उमेदवारांची नियुक्ती कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत असून त्यांची सेवासमाप्ती कोणतीही पूर्व सूचना न देता करण्यात येईल.

६. जर त्यांना नोकरी सोडावयाची असेल तर त्यांनी एक महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या दिवसांची आगाऊ लेखी सूचना द्यावी अन्यथा त्यांना त्यांच्या एक महिन्याच्या मूळ वेतनाएवढी रक्कम शासन जमा करावी लागेल.

७. अन्वेषक, गट – क पदासाठी अस्तित्वात असलेल्या अथवा भविष्यात अस्तित्वात येणा-या सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियमानुसार विहित केलेली विभागीय परीक्षा त्यांना विहित संधीत उत्तीर्ण व्हावी लागेल अन्यथा संभाव्य परिणाम उक्त नियमातील तरतुदीनुसार विनियमित होतील.

८. शासनाच्या प्रचलित नियमानुसार, उमेदवारांना यथास्थिती विहित केलेली एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

९. वरील उमेदवारांची नियुक्ती दिनांक १/११/२००५ नंतरची असल्याने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:अनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अनुसार त्यांना **अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme)** लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१०. कोणत्याही प्रकारच्या शासकीय / निमशासकीय अथवा खाजगी सेवेत असणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या विद्यमान नियोक्त्यांकडून विहित पध्दतीने कार्यमुक्त होऊन तसे प्रमाणपत्र रुजू होताना सादर करणे आवश्यक आहे किंवा इतर कोणत्याही सेवेत कार्यरत नसल्याबाबतचे घोषणापत्र त्यांना भरुन द्यावे लागेल.

११. संचालनालयाची पदे राज्यस्तरीय असल्याने ते राज्यात संचालनालयाच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयांत नियुक्ती/लोकहितास्तव बदलीस पात्र राहतील.

१२. सदर उमेदवारांनी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास त्यात फेरबदल करता येणार नाही.

**१३. सदरची नियुक्ती यादी ही सेवा ज्येष्ठता यादी नसून उमेदवारांची सेवाज्येष्ठता निवड प्रक्रीया पुर्ण झाल्यावर निश्चित करण्यात येईल.**

**१४. सदर नियुक्ती वैदयकीय तपासणीमध्ये शारिरीक दृष्टया पात्र असण्याच्या व चारित्र्य आणि पूर्व चारित्र्य पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे त्यांची नियुक्ती पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली आहे व सेवासमाप्ती पूर्वसूचना न देता करण्यात येईल.**

१५. उपरोक्त उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावे. या कालावधीत ते / त्या रुजू न झाल्यास त्यांची अन्वेषक, गट – क पदावरील नियुक्ती रद्द समजण्यात येईल व त्यांचा अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सदर भरती प्रक्रियेत नोकरी मिळण्याचा हक्क आपोआपच संपुष्टात येईल.

१६. नियुक्ती दिलेल्या कार्यालयात रुजू होण्यासाठी उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

१७. अन्वेषक, गट – कं पदावर रुजू होण्यापूर्वी जंर एखादया उमेदवाराने राज्यं शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, नगर पालिका, महानगर पालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, कंपन्या, जिल्हा परिषदा, अन्य संस्था व इतर सर्व कार्यालये इ. यामधील विविध पदांसाठी अर्ज केले असतील तर त्यांना शासकीय सेवेचा राजीनामा स्विकारण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि. ०२/१२/१९९७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**(क) सर्वसाधारण सुचना**

१. अन्वेषक, गट – क संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संकेतस्थळ www.mahades.maharashtra.gov.in वर ठेवण्यात आलेले आहेत. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी अन्वेषक, गट – क पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार ते/त्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक पात्रता, वय तसेच इतर विहित अटी पूर्ण करतात किंवा कसे हे उमेदवारांनी सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रावरुन तपासावे

तसेच उमेदवारांची नियुक्ती ज्या प्रवर्गातून व समांतर आरक्षणातून झाली आहे त्या निवडीच्या प्रवर्गाच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रे तपासून व खातरजमा करुनच त्यांना रुजू करुन घ्यावे.

२. संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त उमेदवारांचे रुजू आदेश संचालनालयास तात्काळ पाठवावेत. तसेच उपरोक्त उमेदवारांची वैदयकीय तपासणी आणि चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी आपल्या कार्यालयामार्फत करून अहवालाची प्रत संचालनालयास पाठविण्यात यावी. ज्या उमेदवारांची नियुक्ती अजा / अज / विजा-अ / भज-ब / भज-क / भज-ड / इमाव / विमाप्र या प्रवर्गातून झाली आहे व ज्यांनी नियुक्तीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांची नियुक्ती जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अधिन राहून करण्यात आली असल्याने त्यांचे कडून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व संचालनालयास पाठवावे. जे उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर करणार नाहीत त्यांची सेवा सहा महिन्यांनंतर समाप्त करण्यात यावी.

३. उमेदवारांनी रुजू होतांना दिलेल्या प्रमाणपत्रांची एक प्रत संबंधित सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांना तात्काळ पाठवावी.

(कृ. व. फिरके)
संचालक
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,

--------------------------------------

--------------------------------------

--------------------------------------

प्रत : माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग (का.१४२६), मंत्रालय, मुंबई.
४. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण/ नाशिक
५. उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, पालघर/ नाशिक/ रायगड/ मुंबई शहर.
६. अपर कोषागार अधिकारी, अपर कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पालघर/ नाशिक/ रायगड/ मुंबई शहर.

प्रत :

१. अपर संचालक (सर्व) []
२. सह संचालक (सर्व) []
३. प्रशासन शाखा-१/२/३/४ []
४. प्रशिक्षण शाखा - नवनियुक्त अन्वेषक, गट – क यांचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी []
५. ज्येष्ठतासूची कार्यासन (प्रशा-२) []
६. सेवापुस्तक कार्यासन (प्रशा-४) []
७. संगणक मुख्य नोंदवही (प्रशा-२) []
८. निवड नस्ती []

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई.